# RInfra–Transmission (RInfra-T)

Executive Summary – Marathi:

Multi Year Tariff (MYT) Mid-Term Review (MTR) Petition for the Control Period: FY 2016-17 to FY 2019-20

Filed with

Maharashtra Electricity Regulatory Commission

# अनुक्रमणिका

**१. परिचय....४**
१.१ बहुवार्षिक दरपत्रक (एमवायटी) विनियम....४
१.२ एमटीआर याचिकेचे उद्दिष्ट....४

**२. माननीय एटीईसमोर अपील....४**
**३. आ.व. १५-१६ साठी अचूक समायोजन....५**
३.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....५
३.१.१ घसारा....५
३.१.२ भांडवली कर्जावरील व्याज....६
३.१.३ अर्थपुरवठ्याची योजना....६
३.१.४ निवृत्ती....७
३.१.५ इक्विटीवरील परतावा....७
३.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....७
३.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड....७
३.२.२ ओ अँड एम मधील कार्यक्षमता लाभ/हानी....७
३.२.३ प्रचालनाशी संवंधित अतिरिक्त खर्च....८
३.३ खेळत्या भांडवलावरील व्याज....९
३.४ आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी....९
३.५ आयकर....९
३.६ आ.व. १५-१६साठी महसूल....९
३.६.१ आंतरराज्य पारेषण प्रणालीपासून महसूल....९
३.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न....९
३.६.३ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न....१०
३.७ आरइन्फ्रा-टी नेटवर्कवरील उपलब्धता प्रोत्साहन....१०
३.८ आ.व. १५-१६साठी महसुली तफावत/अधिक्य....११

**४. आ.व. १६-१७साठी अचूक समायोजन....१२**
४.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....१२
४.१.१ घसारा....१२
४.१.२ भांडवली कर्जावरील व्याज....१३
४.१.३ इक्विटीवरील परतावा....१३
४.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....१३
४.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड....१३
४.२.२ प्रचालन आणि देखभालीतील कार्यक्षमता लाभ/हानी....१४
४.३ खेळत्या भांडवलावरील व्याज....१४
४.४. आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी....१५

४.५ आयकर......................................................................................................................१५
४.६ आ.व. १६–१७साठी महसूल......................................................................................१५
४.६.१ आंतरराज्य पारेषण प्रणालीतून महसूल......................................................................१५
४.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न.....................................................................................१५
४.६.३ इतर व्यवसायापासूचे उत्पन्न......................................................................................१६
४.७ आरइन्फ्रा–टी नेटवर्कच्या उपलब्धतेवर प्रोत्साहन..........................................................१६
४.८ आ.व. १६–१७साठी महसुली तफावत/अधिक्य.............................................................१६

**५. आ.व. १७–१८साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता.....................................................................................................१७**

५.१ भांडवली गुंतवणुकीची योजना..................................................................................१८
५.१.१ अर्थपुरवठ्याची योजना...........................................................................................१९
५.१.२ निवृत्ती....................................................................................................................१९
५.१.३ भांडवली कर्जावरील व्याज.......................................................................................१९
५.१.४ घसारा.....................................................................................................................२०
५.१.५ इक्विटीवरील परतावा...............................................................................................२०
५.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च....................................................................२०
५.३ खेळत्या भांडवलावरील व्याज.....................................................................................२१
५.४ आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी...............................................................................२१
५.५ आयकर......................................................................................................................२२
५.६ महसूल.......................................................................................................................२२
५.६.१ आंतरराज्य पारेषण प्रणालीपासून महसूल..................................................................२२
५.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न.....................................................................................२२
५.६.३ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न...................................................................................२३
५.७ आ.व. १५–१६ आणि आ.व. १६–१७ साठी महसुली तफावत/अधिक्य वर कॅरिंग कॉस्टसहित आ.व. १७–१८ पर्यंतची संकलित महसुली तफावत.........................................................................२३
५.८ एकत्रित महसुलाची आवश्यकता.................................................................................२४

**तक्त्यांची यादी**

तक्ता १: सारांश – भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आ.व. १५–१६.........................................५

तक्ता २: सारांश – वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च आ.व. १५–१६....................................८

तक्ता ३: आ.व. १५–१६साठी अचूक समायोजन सारांश...........................................................११

तक्ता ४: सारांश – भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आ.व. १६–१७.......................................१२

तक्ता ५: सारांश – वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च आ.व. १६–१७..................................१४

तक्ता ६: आ.व. १६–१७साठी अचूक समायोजन सारांश..........................................................१६

तक्ता ७: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आ.व. १७–१८..........................................................................१८

तक्ता ८: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आ.व. १८–१९..........................................................................१८

तक्ता ९: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आ.व. १९–२०..........................................................................१८

तक्ता १०: प्रचालन आणि देखभाल खर्च आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२०.....................................................२१

तक्ता ११: कॅरिंग कॉस्टची गणना..........................................................................................................२३

तक्ता १२: आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२० साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता..........................................२५

# १. परिचय

### १.१ बहुवार्षिक दरपत्रक (एमवायटी) विनियम

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (यानंतर ज्याचा उल्लेख ''माननीय आयोग''/माननीय मनिविआ'' असा केलेला आहे) यांनी त्यांना विद्युत कायदा, २००३ (यानंतर ज्याचा उल्लेख ईए ०३ असा केलेला आहे) अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पुढील नियमावली जारी केलेली आहे.

- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक दर) नियमावली, २०११ (यानंतर जिचा उल्लेख एमवायटी नियमावली, २०११ असा केलेला आहे), दिनांक ४ फेब्रुवारी २०११ रोजी आणि
- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक दर) नियमावली, २०१५ (यानंतर जिचा उल्लेख एमवायटी नियमावली, २०१५ असा केलेला आहे), दिनांक ८ डिसेंबर २०१५ रोजी.

एमवायटी नियमावली, २०११ ही रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला (यानंतर आरइन्फ्रा असा उल्लेख) दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आ.व. १२–१३ पासून पुढे (२०११च्या प्रकरण क्र. ४५ मधील माननीय आयोगाच्या आदेशान्वये) आ.व. १५–१६ पर्यंत लागू आहे. एमवायटी नियमावली, २०१५ तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आ.व. १६–१७ पासून आ.व. १९–२० पर्यंत लागू आहे.

### १.२ एमटीआर याचिकेचे उद्दिष्ट

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ५.१(बी) मध्ये आ.व. १५–१६ आणि आ.व. १६–१७ साठी अचूक समायोजन आणि आ.व. १७–१८साठी तात्पुरते समायोजन आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी सुधारित एआरआरचे भाकीत यांविषयी तरतूद केलेली आहे. सदर विनियमाच्या अनुषंगाने आरइन्फ्रा–ट्रान्समिशनने (यानंतर आरइन्फ्रा–टी असा उल्लेख केलेला आहे विद्यमान याचिका दाखल केलेली आहे.

# २. माननीय एटीईसमोर अपील

- माननीय आयोगाने २०१४च्या प्रकरण २२१मध्ये दिनांक २६–०६–२०१५ रोजी आदेश जारी केलेला आहे, ज्याविरुद्ध आरइन्फ्रा–टीने माननीय विद्युत अपीलीय लवादाकडे (यानंतर माननीय एटीई असा उल्लेख) अपील क्र. २२३/२०१५ सादर केलेले आहे. माननीय एटीईने हे अपील दाखल करून घेतलेले आहे आणि ह्या प्रकरणाची सुनावणी सध्या चालू आहे.

- माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण १३मध्ये दिनांक २२–०६–२०१६ रोजी आदेश जारी केलेला आहे, ज्याविरुद्ध आरइन्फ्रा–टीने माननीय विद्युत अपीलीय लवादाकडे (यानंतर माननीय एटीई असा उल्लेख) अपील क्र. २३७/२०१६ सादर केलेले आहे. माननीय एटीईने हे अपील दाखल करून घेतलेले आहे आणि ह्या प्रकरणाची सुनावणी सध्या चालू आहे.

माननीय आयोगाच्या निकालानुसार ही याचिका, सदर अपीलातील/अपीलांतील म्हणण्याला आरइन्फ्रा–टीच्या म्हणण्याला बाधा न आणता, दाखल करण्यात येत आहे.

## ३. आ.व. १५–१६साठी अचूक समायोजन

या याचिकेत आरइन्फ्रा–टी भांडवली खर्च, महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न यांच्या बाबतीतील आ.व. १५–१६ साठीची वास्तविक आकडेवारी अचूक समायोजनासाठी सादर करीत आहे.

### ३.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–टीने भांडवली खर्चासाठी रु.५०.५६ कोटी एवढी रक्कम भांडवली खर्चासाठी खर्च केलेली आहे आणि वास्तविक भांडवलीकरण रु.५०.३५ कोटी एवढे आहे (आयडीसीसहित).

भांडवली खर्च आणि भांडवलीकरण यांचा सारांश खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता १: सारांश – भांडवली खर्च आणि भांडवलीकरण, आ.व. १५–१६**

| कोटी रु. | | वास्तविक | एमवायटी आदेश |
|---|---|---:|---:|
| भांडवली खर्च | डीपीआर | ४३.२० | – |
| | बिगर डीपीआर | ७.३६ | – |
| | **एकूण** | **५०.५६** | **–** |
| भांडवलीकरण | डीपीआर | ४२.३५ | ४२.०९ |
| | बिगर डीपीआर | ८.०० | ८.०० |
| | **एकूण** | **५०.३५** | **५०.०९** |

#### ३.१.१ घसारा

एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३१ मध्ये घसाऱ्याची गणना करण्याच्या पद्धतीची तरतूद आहे. ह्या विनियमाच्या अनुसार घसाऱ्याची गणना केलेली आहे. आरंभीच्या जीएफएवर (ग्रॉस फिक्स्ड असेट) घसाऱ्याचा दावा

करण्यात आलेला आहे आणि वर्षभरात जोडलेल्या मत्तेवरही तो करण्यात आलेला आहे (जोडल्याच्या वास्तविक तारखेनुसार त्या प्रमाणात).

### ३.१.२ भांडवली कर्जावरील व्याज

आरइन्फ्रा–टीकडे सध्याचा कॉर्पोरेशन बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद आणि साऊथ इंडियन बँक यांच्याकडून वेगवेगळ्या व्याजदरावर घेतलेले भांडवली खर्चासाठीचे कर्ज आहे. आ.व. १५–१६मध्ये आरइन्फ्रा–टी ह्या कर्जांसाठी पुन्हा अर्थपुरवठा/पुन्हा वाटाघाटी करू शकली, परिणामस्वरूपी, ह्या आधीच्या कर्जांची जागा स्टेट बँक ऑफ इंडिया, साऊथ इंडियन बँक आणि स्टेट बँक ऑफ हैद्राबाद यांच्याकडून संयुक्तपणे (कन्सोर्शिअम) ११% व्याजदराने घेतलेल्या कर्जाने घेतलेली आहे. परिणामस्वरूपी, जेव्हा ह्या कर्जांसाठी पुन्हा अर्थपुरवठा/पुन्हा वाटाघाटी केल्या, तेव्हा आ.व. १५–१६च्या सुरुवातीला असलेला ११.९४% वेटेड ॲव्हरेज इंटरेस्ट रेट कमी होऊन तो आ.व. १५–१६च्या शेवटी ११% झालेला आहे.

परंतु, आ.व. १५–१६चा जोपर्यंत संबंध आहे, तोपर्यंत दीर्घकालीन कर्जावरील व्याजाची गणना दिनांक ०१–०४–२०१५ रोजीच्या लोन पोर्टफोलिओचा वेटेड इंटरेस्ट रेटचा वापर करून, एमवायटी नियमावली, २०११ अनुसार, जी माननीय आयोगाने आ.व. १५–१६चे तात्पुरते अचूक समायोजन करण्यासाठी एमवायटी आदेशामध्ये लागू केलेली आहे. काहीही असले, तरी पुनर्वित्तीकरण २०१६च्या मार्च महिन्यात झालेले असल्याने, पुनर्वित्तीकरणाचा लाभ, कमी व्याजदराच्या बाबतीत, आ.व. १६–१७ पासूनच पुढे उपलब्ध असेल.

नियामक आरंभीची आणि अखेरची शिल्लक, घसाऱ्याएवढे नमुन्यादाखलची परतफेड आणि दिनांक ०१–०४–२०१५ रोजीचे वेटेड ॲव्हरेज इंटरेस्ट रेट यावर आधारित आ.व. १५–१६ साठीच्या दीर्घकालीन कर्जावरील अनुज्ञेय व्याजाची गणना केली गेलेली आहे.

### ३.१.३ अर्थपुरवठ्याची योजना

२०१६च्या प्रकरण १३मधील एमवायटी याचिकेच्या न्यायप्रक्रियेदरम्यान, आरइन्फ्रा–टीने पुनर्वित्तीकरण करण्यामुळे कराव्या लागणाऱ्या वित्तीय आकारांचा उल्लेख केलेला होता आणि हेही सांगितले होते की, कमी व्याजदराने केलेल्या पुनर्वित्तीकरणाच्या परिणामस्वरूपी पारेषण प्रणालीचा वापर करणाऱ्यांना दिलेला निव्वळ लाभ हा पुनर्वित्तीकरणावरील खर्चापेक्षा खूप अधिक आहे. एमवायटी आदेशात माननीय आयोगाने आरइन्फ्रा–टीच्या ह्या म्हणण्याची दखल घेतली होती आणि पुनर्वित्तीकरणाला मान्यता दिली होती. कर्जाच्या पुनर्वित्तीकरणासाठी आरइन्फ्रा–टीने वित्तीय आकारासाठी खर्च केलेली रक्कम ३.५१ कोटी रुपये एवढी आहे.

### ३.१.४ निवृत्ती

आरइन्फ्रा–टीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी आ.व. १५–१६मध्ये २.०२ कोटी रुपये किमतीच्या विशिष्ट मत्ता प्रणालीतून निवृत्त केलेल्या आहेत. निवृत्तीचा हा परिणाम त्यानुसार ग्रॉस फिक्स्ड असेटमध्ये (जीएफए) समायोजित केलेला आहे. कर्जाऊ भांडवलाच्या बाबतीत ह्या मालमत्ता २००० सालाच्या आसपास उभारल्या असल्याने नमुन्यादाखलच्या संबंधित कर्जाची परतफेड झालेली आहे असे समजता येऊ शकते, ज्यासाठी निवृत्तीमुळे कर्जाऊ भांडवलामध्ये समायोजन करण्याची आवश्यकता नाही.

### ३.१.५ इक्विटीवरील परतावा

आ.व. १५–१६साठी इक्विटीवरील परतावा (आरओई) हा एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३२.२च्या आधारे, म्हणजेच वर्षाच्या सुरुवातीच्या समभाग भांडवलावर १५.५% दराने आधिक वर्षभरात निवृत्त केलेल्या मत्तेवरील निव्वळ इक्विटी वजा जाता वर्षभरात भांडवलीकरण केलेल्या मत्तेच्या इक्विटी हिश्श्याच्या ५०% ने केलेली आहे.

## ३.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

### ३.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड

२०१६च्या प्रकरण क्र. १३मध्ये माननीय आयोगाने आ.व. १५–१६च्या अखेरीस सेवेत असलेल्या २२०केव्हीच्या ५३८.६६ सर्किट किमी लांबीच्या वाहिन्या मान्य केलेल्या आहेत. आ.व. १५–१६च्या अखेरीस आरइन्फ्रा–टीकडे, त्यांच्या पारेषण प्रणालीचा एक हिस्सा म्हणून २२०केव्हीचे ११५ बेज् आणि ३३केव्हीचे ३७१ बेज् आहेत. परंतु, नमुन्यादाखलचा ओ अँड एम खर्च मान्य करण्यासाठी माननीय आयोगाने, सदरच्या एमवायटी आदेशात, आ.व. १५–१६च्या अखेरीस २२०केव्हीच्या १०४ बेज् आणि ३३केव्हीच्या ३६६ बेज् मान्य केलेले आहेत. माननीय आयोगाने विचारात घेतलेल्या कमी बेज्च्या बाबीला आरइन्फ्रा–टीने माननीय एटीएसमोर आव्हान दिलेले आहे. परंतु, अपीलात जे काही म्हटलेले आहे, त्यास बाधा न आणता, आरइन्फ्रा–टीने, माननीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिलेले सर्किट किमी आणि बेज् विचारात घेऊन, नमुन्यादाखलच्या ओ अँड एम खर्चाची गणना केलेली आहे (एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ६१.६मध्ये दिलेल्या मापदंडांनुसार).

मापदंडांनुसार एकूण ओ अँड एम खर्च रु.४०.६६ कोटी एवढा आहे.

### ३.२.२ प्रचालन आणि देखभालीतील कार्यक्षमता लाभ/हानी

एमवायटी नियमावली, २०११च्या १२.२(जी)नुसार नियंत्रणयोग्य घटकांमुळे प्रचालन आणि देखभाल खर्चात बदल झालेले आहेत. मापदंडांनुसार वास्तविक खर्चाच्या तुलनेत प्रत्यक्ष प्रचालन आणि देखभाल खर्च यांच्यातील विकलन (फरक) म्हणून गणना केलेली आहे.

रु.४०.६६ कोटी एवढा नमुन्यादाखलच्या खर्चाची तुलना रु.४३.१५ कोटी एवढ्या वास्तविक खर्चाशी (कॉर्पोरेट खर्चासाठी अनुज्ञेय रक्कम, एससीएडीए आकार, जमिनीच्या वापरासाठीचे आकार आणि विद्युत आकार वगळून) केली जाऊ शकते परिणामस्वरूपी नियंत्रणयोग्य कार्यक्षमतेची हानी रु.२.४९ कोटी एवढी असेल.

एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम १४.२मध्ये नियंत्रणयोग्य घटकांमुळे झालेल्या लाभाच्या वाटपासंबंधी तरतूद आहे. म्हणून त्या विनियमांनुसार तोट्यापैकी २/३ तोटा, म्हणजेच रु.१.६६ कोटी एवढा तोटा आरइन्फ्रा–टीने सोसला पाहिजे.

### ३.२.३ प्रचालनाशी संबंधित अतिरिक्त खर्च

२०१६च्या प्रकरण क्र. १३मधील याचिकेत आरइन्फ्रा–टीने असे म्हटलेले आहे की, नवीन घडमोडींमुळे तसेच विशिष्ट खर्च समोर आल्याने/आरइन्फ्राने पारेषण आणि वितरण व्यवसायात केलेल्या पुनर्गटवारीमुळे, दोन स्वतंत्र संस्थांमध्ये संपूर्ण वेगळेपण जपण्यासाठी आणि अंतर राखण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागतो. आरइन्फ्रा–टीने असे म्हटलेले आहे की, हे खर्च एमवायटी मापदंड तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या ऐतिहासिक प्रचालन आणि देखभाल खर्चाचा हिस्सा नव्हते.

माननीय आयोगाने एमवायटी आदेशात, मापदंडांनुसार लागू असलेल्या प्रचालन आणि देखभाल खर्चाव्यतिरिक्त अशा खर्चांना मान्यता देण्याची कृपा केली होती. उपरोक्तानुसार, आ.व. १५–१६ साठी आरइन्फ्रा–टी अशा शीर्षकांसाठी वास्तविक खर्चांचा दावा करीत आहे.

वर जे म्हटलेले आहे त्याच्या आधारे आरइन्फ्रा–टीने आ.व. १५–१६साठी वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाच्या सारांशाचा दावा केलेला आहे.

**तक्ता २: सारांश – वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च, आ.व. १५–१६**

| प्रचालन आणि देखभाल खर्च (कोटी रु.) | वास्तविक | एमवायटी आदेश/नमुनेदाखल | फरक |
|---|---|---|---|
| आधारभूत प्रचालन आणि देखभाल खर्च | ४३.१५ | ४०.६६ | २.४९ |
| आरइन्फ्रा–टीने सहन करावयाची कार्यक्षमता हानी | (१.६६) | – | (१.६६) |
| कॉर्पोरेटसाठी हिस्सा | २.५७ | २.३४ | ०.२३ |
| ऊर्जा आकार | ३.८१ | ३.८१ | – |
| एससीएडीए आकार | १.१७ | १.१७ | – |
| जमीनवापरासाठी आकार | ३.८६ | ३.८६ | – |
| **एकूण प्रचालन आणि देखभाल खर्च** | **५२.८९** | **५१.८५** | **१.०४** |

### ३.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

खेळत्या भांडवलाची गणना, एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३५.२ नुसार केलेली आहे. व्याजाचा दर माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण १३मध्ये दिलेल्या आदेशानुसार, म्हणजेच १४.७५% एवढा विचारात घेतलेला आहे.

### ३.४ आकस्मिकता आरक्षितासाठी वर्गणी

आकस्मिकता आरक्षितासाठीच्या वर्गणीची गणना एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३६.१ नुसार, म्हणजेच आरंभीच्या जीएफच्या ०.२५% एवढी केलेली आहे.

### ३.५ आयकर

पारेषण व्यवसायांसाठी स्वतंत्र (स्टँड–अलोन) करपूर्व नियामक नफा (पीबीटी) निश्चित करण्यासाठी निश्चित आणि मान्य करण्यात आलेल्या पद्धतीवर आधारित आयकराची गणना आरइन्फ्रा–टीद्वारे केली गेलेली आहे. आरइन्फ्रा–टीने, प्रारूपांनुसार करयोग्य उत्पन्न निश्चित केल्यानंतर आयकराची गणना कॉर्पोरेट टॅक्सच्या दराने तसेच बुक प्रॉफिटवर एमएटी दराने केलेली आहे. या दोहोंपैकी जो अधिक असेल, तो त्यानंतर विचारात घेतलेला आहे.

### ३.६ आ.व. १५–१६साठी महसूल

#### ३.६.१ आंतरराज्य पारेषण प्रणालीपासून महसूल

पारेषण आकारापासूनच्या महसुलाच्या बाबतीत त्याची गणना अशा प्रकारे केलेली आहे–

अ. एप्रिल २०१५साठी आणि मे २०१५साठी, माननीय आयोगाने २०१४च्या प्रकरण क्र. १२३मध्ये दिलेल्या दिनांक १४–०८–१४च्या आदेशावर आधारित, ज्यात दरमहा ३३.३१ कोटी रुपये एवढ्या आकारांना मान्यता देण्यात आली होती.

ब. जून २०१५साठी आणि मार्च २०१६साठी माननीय आयोगाने २०१५च्या प्रकरण क्र. ५७ मध्ये दिलेल्या दिनांक २६–०६–१५च्या आदेशावर आधारित, ज्यात दरमहा १७.४१ कोटी रुपये एवढ्या आकारांना मान्यता देण्यात आली होती.

म्हणून पारेषण आकारांपासूनचा महसूल रु.२४०.६८ कोटी एवढा विचारात घेतलेला आहे.

#### ३.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

दरपत्रकाव्यतिरिक्तच्या (एनटीआय) उत्पन्नाची महत्त्वाची शीर्षके खाली दिल्यानुसार आहेत:

- आकस्मिक आरक्षितांसाठीच्या गुंतवणुकीवरील व्याज: आकस्मिकता आरक्षितांसाठीच्या गुंतवणुका भारत सरकारच्या सेक्युरिटिज्मध्ये केल्या जातात आणि त्यानुसार व्याजाची गणना केली जाते.
- रोखीत रूपांतर झालेली नुकसानभरपाई: विविध उपकरणांची डिलिव्हरी करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेपेक्षा अधिक उशीर झाल्याबद्दल व्हेंडर्सकडून प्राप्त झालेली नुकसानभरपाई एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.
- चलनातील लाभ/हानी प्राप्त होणे: साहित्य प्राप्त झाल्याची तारीख आणि प्रत्यक्ष पैसे दिल्याची तारीख/वर्ष संपल्याची तारीख यांमधील दराचा फरकामुळे परकीय चलनातील लाभ/(हानी) एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.
- भंगाराची विक्री: भंगाराच्या विक्रीतून प्राप्त झालेली रक्कम एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.
- जमिनीच्या वापरापासून मिळालेले भाड्याचे उत्पन्न: आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डी यांच्यामध्ये जमिनीच्या वापरासाठी झालेल्या समझोता कराराच्या आधारे आरइन्फ्रा–टीला आरइन्फ्रा–डीकडून भाडे प्राप्त होत असते. त्यानुसार ते एनटीआयमध्ये विचारात घेतलेले आहे.
- विलंबित प्रदान आकार: माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण १३ मधील एमवायटी आदेशात, आरइन्फ्रा–टीला दिनांक ३१–०३–२०१६ रोजी देय असलेले विलंबित प्रदानासाठीचे आकार रु.४५.८९ कोटी, दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न म्हणून विचारात घेतलेले आहेत. आरइन्फ्रा–टीने ह्या बाबीला माननीय एटीईसमोर आव्हान दिलेले आहे. ह्या अपीलास बाधा न आणता, आरइन्फ्रा–टी सदरची रक्कम आ.व. १५–१६साठी सध्याच्या याचिकेत एनटीआय म्हणून विचारात घेत आहे.

### ३.६.३ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न

आरइन्फ्रा–टीने त्यांच्या उपकेंद्राच्या छतावरील जागा रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडचा बीटीएस टॉवर उभारण्यासाठी भाड्याने दिलेली आहे. एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ६३.१ अनुसार, इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वजा करून प्राप्त झालेली १/३ रक्कम आरइन्फ्रा–टीने विचारात घेतलेली आहे.

## ३.७ आरइन्फ्रा–टीच्या नेटवर्कच्या उपलब्धतेसाठी प्रोत्साहन

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) यांनी आरइन्फ्रा–टीसाठी पारेषण प्रणाली उपलब्धता आ.व. १५–१६ साठी ९९.८३% एवढी प्रमाणित केलेली आहे.

एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ६०.१ आणि ६०.२ यांच्या एकत्रित वाचनाच्या आधारे आरइन्फ्रा–टीने पारेषण उपलब्धतेवरील प्रोत्साहन, ह्या उपलब्धतेची गणना ९९.७५% पर्यंत सीमित करून केलेली आहे. प्रोत्साहन

निश्चित करण्यासाठी विचारात घेतलेले वार्षिक पारेषण आकार दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वगळून आहेत. प्रोत्साहन रक्कम रू.३.९७ कोटी आहे.

### ३.८ आ.व. १५–१६साठी महसुलातील तफावत/अधिक्य

आ.व. १५–१६साठी महसुली तफावत/अधिक्य हे आंतरराज्य पारेषण प्रणालीतून प्राप्त झालेला महसूल आणि एकत्रित महसुलाची आवश्यकता (दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वगळून) यांची तुलना करून काढलेले आहे. आ.व. १५–१६साठीच्या एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश खालील तक्त्यात दिलेला आहे:

**तक्ता ३: आ.व. १५–१६साठी अचूक समायोजन सारांश**

| अ.क्र. | तपशील (कोटी रू.) | वास्तविक (अंतिम अचूक समायोजनासाठी) | एमवायटी आदेश (तात्पुरते अचूक समायोजन) | फरक |
|---|---|---|---|---|
| | **खर्च** | | | |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ५२.८९ | ५१.८५ | १.०५ |
| २ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ७०.१२ | ७०.११ | ०.०१ |
| ३ | वित्तपुरवठ्यासाठी आकार | ३.५१ | – | ३.५१ |
| ४ | घसारा | ६१.१८ | ६१.१८ | – |
| ५ | इक्विटीवरील परतावा | ७४.२२ | ७४.२१ | ०.०१ |
| ६ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ५.३९ | ५.३३ | ०.०५ |
| ७ | आकस्मिक आरक्षितांसाठी वर्गणी | ३.५९ | ३.५९ | – |
| ८ | आयकर | २२.२९ | २७.९४ | (५.६५) |
| **क** | **एकूण खर्च** | **२९३.१८** | **२९४.२०** | **(१.०२)** |
| ९ | उपलब्धता प्रोत्साहन | ३.९७ | – | ३.९७ |
| **ख** | **एकूण एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **२९७.१५** | **२९४.२०** | **२.९५** |
| | **महसूल** | | | |
| १० | आंतरराज्य पारेषण प्रणालीतून महसूल | २४०.६८ | २४०.६८ | – |
| ११ | दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ४८.७४ | ४८.८२ | (०.०८) |
| १२ | इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | ०.०३ | ०.०२ | ०.०१ |
| **ग** | **एकूण महसूल** | **२८९.४५** | **२८९.५२** | **(०.०७)** |
| घ | आ.व. २०१३–१४ पर्यंत संकलित महसुली तूट, कॅरिंग कॉस्टसहित | १२.९४ | १२.९४ | – |
| च | आ.व. २०१४–१५साठी महसुली तफावत/(अधिक्य) | (२१.३२) | (२१.३२) | – |
| छ | २०१२च्या अपील क्र.१३९वरील एटीईच्या निकालाचा परिणाम | ८.७२ | ८.७२ | – |

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | वास्तविक (अंतिम अचूक समायोजनासाठी) | एमवायटी आदेश (तात्पुरते अचूक समायोजन) | फरक |
|---|---|---|---|---|
| ज | **महसुली तफावत/(अधिक्य) = (ख – ग + घ + च + छ)** | **८.०७** | **५.०४** | **३.०३** |
| झ | **सहामाहीसाठीच्या तफावतीलवरील कॅरिंग कॉस्ट** | **०.३०** | | **०.३०** |
| ट | **महसुली तफावत/(अधिक्य) = ज + झ** | **८.३७** | **५.०४** | **३.३३** |

आरइन्फ्रा–टी माननीय आयोगाला विनंती करीत आहे की, आ.व. १५–१६साठी उपरोक्त महसुली तफावतीला कृपया मान्यता द्यावी.

## ४. आ.व. १६–१७साठी उचित समायोजन

या याचिकेत आरइन्फ्रा–टी आ.व. १६–१७साठीचे भांडवली खर्च, महसुली खर्च आणि महसुली उत्पन्न याविषयीची वास्तविक आकडेवारी अचूक समायोजनासाठी सादर करीत आहे.

### ४.१ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–टीने भांडवली खर्चासाठी रु.४९.८२ कोटी एवढी रक्कम खर्च केलेली आहे आणि वास्तविक भांडवली खर्च रु.२२.१२ कोटी एवढा आहे (आयडीसीसहित)

भांडवली खर्च आणि आणि भांडवलीकरण यांचा सारांश खालीलप्रमाणे आहे:

**तक्ता ४: सारांश – भांडवली खर्च आणि भांडवलीकरण, आ.व. १६–१७**

| (कोटी रु.) | | वास्तविक | एमवायटी आदेश |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च रू. क | डीपीआर | ४२.४९ | – |
| | बिगर डीपीआर | ७.३३ | – |
| | **एकूण** | **४९.८२** | **–** |
| भांडवलीकरण | डीपीआर | १८.५२ | ७४.७० |
| | बिगर डीपीआर | ३.६० | ११.२७ |
| | **एकूण** | **२२.१२** | **८५.९७** |

#### ४.१.१ घसारा

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २७.१मध्ये घसाऱ्याची गणना करण्याच्या पद्धतीची तरतूद आहे. ह्या विनियमाच्या अनुसार घसाऱ्याची गणना केलेली आहे. आरंभीच्या जीएफएवर (ग्रॉस फिक्स्ड असेट) घसाऱ्याचा दावा

करण्यात आलेला आहे आणि वर्षभरात जोडलेल्या मत्तेवरही तो करण्यात आलेला आहे (जोडल्याच्या वास्तविक तारखेनुसार त्या प्रमाणात).

### ४.१.२ कर्जाऊ भांडवलावरील व्याज

आम्ही असे म्हणतो की, दिनांक ०१–०४–२०१६ पर्यंत सीडब्ल्यूआयपी उघडण्यासाठी किंवा आ.व. १६–१७ साठीच्या वाढत्या भांडवली खर्चासाठी पैसे उभारण्यासाठी कोणतेही नवीन कर्ज घेतलेले नाही. आ.व. १६–१७मधील भांडवली खर्चासाठीचे पैसे, म्हणूनच अंतर्गत निधीमधून पुरविले गेले आहेत, जे नमुन्यादाखलच्या ७० : ३० ह्या डेट : इक्विटी गुणोत्तरात विचारात घ्यायचे आहेत.

परंतु, आ.व. १६–१७चा जोपर्यंत संबंध आहे, तोपर्यंत दीर्घकालीन कर्जावरील व्याजाची गणना एमवायटी नियमावली, २०१५ मधील विनियम क्र. २९.५मध्ये दिलेली पहिली अट विचारात घेऊन करण्याची गरज आहे.
आरइन्फ्रा–टीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी व्याजाचा वेटेड ॲव्हरेज रेटची गणना वर्षादरम्यानच्या वास्तविक लोन पोर्टफोलिओच्या आधारे केलेली आहे. वेटेड ॲव्हरेज इंटरेस्ट रेट १०.९९% एवढा येतो. नियामक आरंभीची आणि अखेरची कर्जाची शिल्लक रक्कम, घसाऱ्याइतके नमुन्यादाखलचा परतावा आणि वेटेड इंटरेस्ट रेट यांच्यावर आधारित, आ.व. १६–१७साठी अनुज्ञेय व्याजाची गणना केलेली आहे.

### ४.१.३ इक्विटीवरील परतावा

आ.व. १६–१७साठी इक्विटीवरील परतावा (आरओई) समभाग भांडवलावर वर्षाच्या सुरुवातीला १५.५% दराने अधिक वर्षाच्या दरम्यान भांडवलीकरण केलेल्या मत्तांचा ५०% इक्विटी पोर्शनवर गणले गेले आहे. हे एमवायटी नियमावली, २०१५च्या विनियम २८.२ आणि २८.३ नुसार आहे.

## ४.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

### ४.२.१ एमवायटी नियमावलीनुसार मापदंड

विद्यमान याचिकेच्या विभाग क्र. ३.२.१मध्ये स्पष्ट केल्यानुसार आरइन्फ्रा–टीने आ.व. १६–१७साठीचे नमुनेदाखल प्रचालन आणि देखभाल खर्चांची गणना आ.व. १५–१६च्या आरंभीचे सर्किट किमी आणि बेज् बरोबर अखेरचे सर्किट किमी आणि बेज् विचारात घेऊन केलेली आहे. माननीय आयोगाने ज्या वापर न केलेले ३३ केव्हीच्या ५ बेज्चा विचारात घेतलेले आहेत, त्यापैकी एकाची (१) ३३केव्ही जोडणी टीएसयूने आ.व. १६–१७मध्ये केलेली आहे. त्यानुसार, नमुनेदाखलच्या प्रचालन आणि देखभाल खर्चासाठीच्या रकमेची पुनर्गणना करण्यासाठी हा बे विचारात घेतलेला आहे. मापदंडांनुसार एकूण प्रचालन आणि देखभाल खर्च रु.५३.२१ कोटी एवढा आहे.

### ४.२.२ प्रचालन आणि देखभालीतील कार्यक्षमता लाभ/हानी

एमवायटी नियमावली, २०१५च्या ९.२(एफ)नुसार नियंत्रणयोग्य घटकांमुळे प्रचालन आणि देखभाल खर्चात बदल झालेले आहेत. मापदंडांनुसार वास्तविक खर्चाच्या तुलनेत प्रत्यक्ष प्रचालन आणि देखभाल खर्च यांच्यातील विकलन (फरक) म्हणून गणना केलेली आहे.

आ.व. १६–१७मध्ये पीडब्ल्यूडीकडून गोराई–बोरीवली वाहिनीसाठी जमिनीवरून केबल टाकण्यासाठी रु.०.१८ कोटी (आ.व. १५–१६ आणि आ.व. १६–१७ साठी दरसाल ०.०९ कोटी) जमिनीच्या भाड्याची मागणी करण्यात आली. आरइन्फ्रा–टीचे म्हणणे आहे की, पूर्वी आ.व. १५–१६ पर्यंत अशा प्रकारची मागणी कधीही करण्यात आली नव्हती आणि म्हणून ज्या मागील संबंधित वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चावर मापदंड आधारलेले आहेत, त्यात अशा प्रकारच्या कोणत्याही खर्चाचा समावेश नाहीए. म्हणून आरइन्फ्रा–टी माननीय आयोगाला विनंती करते की, वाहिनीची लांबी आणि बेज् नुसार ह्या खर्चाला नमुनेदाखलच्या खर्चाव्यतिरिक्त मंजुरी देण्यात यावी.

रु.५३.२१ कोटी एवढा नमुन्यादाखलच्या खर्चाची तुलना रु.५५.२४ कोटी एवढ्या वास्तविक खर्चाशी (पीडब्ल्यूडीचा आकार वगळून) केली जाऊ शकते परिणामस्वरूपी नियंत्रणयोग्य कार्यक्षमतेची हानी रु.२.०३ कोटी एवढी असेल.

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ११.२मध्ये नियंत्रणयोग्य घटकांमुळे झालेल्या लाभाच्या वाटपासंबंधी तरतूद आहे. म्हणून त्या विनियमांनुसार तोट्यापैकी २/३ तोटा, म्हणजेच रु.१.३६ कोटी एवढा तोटा आरइन्फ्रा–टीने सोसला पाहिजे.

वर उल्लेख केलेल्याच्या आधारे आ.व. १६–१७साठी आरइन्फ्रा–टीने दावा केलेल्या वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्चाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता ५: सारांश – वास्तविक प्रचालन आणि देखभाल खर्च, आ.व. १६–१७**

| प्रचालन आणि देखभाल खर्च (कोटी रु.) | वास्तविक | एमवायटी आदेश/नमुनेदाखल | फरक |
|---|---|---|---|
| आधारभूत प्रचालन आणि देखभाल खर्च | ५५.२४ | ५३.२१ | २.०३ |
| आरइन्फ्रा–टीने सोसावयाची कार्यक्षमता हानी | (१.३६) | – | (१.३६) |
| पीडब्ल्यूडी आकार | ०.१८ | – | ०.१८ |
| **एकूण प्रचालन आणि देखभाल खर्च** | **५४.०७** | **५३.२१** | **०.८६** |

### ४.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

खेळत्या भांडवलाची गणना, एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ३१.२ नुसार केलेली आहे. व्याजाचा दर एमवायटी नियमावली, २०१५च्या विनियम ३१.२(बी)मधील अटीनुसार १०.७९% विचारात घेण्यात आलेला आहे.

### ४.४ आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी

आकस्मिक आरक्षितासाठीची वर्गणी एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३४.१ नुसार, म्हणजेच आरंभीच्या जीएफएच्या ०.२५% एवढी केलेली आहे.

### ४.५ आयकर

पारेषण व्ययसायांसाठी स्वतंत्र (स्टँड–अलोन) करपूर्व नियामक नफा (पीबीटी) निश्चित करण्यासाठी निश्चित आणि मान्य करण्यात आलेल्या पद्धतीवर आधारित आयकराची गणना आरइन्फ्रा–टीद्वारे केली गेलेली आहे. आरइन्फ्रा–टीने, प्रारूपांनुसार करयोग्य उत्पन्न निश्चित केल्यानंतर आयकराची गणना कॉर्पोरेट टॅक्सच्या दराने तसेच बुक प्रॉफिटवर एमएटी दराने केलेली आहे. या दोहोंपैकी जो अधिक असेल, तो त्यानंतर विचारात घेतलेला आहे.

### ४.६ आ.व. १६–१७ साठी महसूल

#### ४.६.१ आंतरराज्य पारेषण प्रणालीपासूनचा महसूल

पारेषण आकारापासूनच्या महसुलाच्या बाबतीत त्याची गणना अशा प्रकारे केलेली आहे–

अ. एप्रिल २०१६साठी आणि जून २०१६साठी, माननीय आयोगाने २०१५च्या प्रकरण क्र. ५७मध्ये दिलेल्या दिनांक २२–०७–१६च्या आदेशावर आधारित, ज्यात दरमहा १७.४१ कोटी रुपये एवढ्या आकारांना मान्यता देण्यात आली होती.

ब. जुलै २०१६साठी आणि मार्च २०१७साठी माननीय आयोगाने २०१६च्या प्रकरण क्र. ९१मध्ये दिलेल्या दिनांक २६–०६–१५च्या आदेशावर आधारित, ज्यात दरमहा २४.४० कोटी रुपये (दरसाल रु.२९२.७९ कोटी) एवढ्या आकारांना मान्यता देण्यात आली होती.

म्हणून पारेषण आकारांपासूनचा महसूल रु.२७१.८२ कोटी एवढा विचारात घेतलेला आहे.

#### ४.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

दरपत्रकाव्यतिरिक्तच्या (एनटीआय) उत्पन्नाची महत्त्वाची शीर्षके खाली दिल्यानुसार आहेत:

- आकस्मिक आरक्षितांसाठीच्या गुंतवणुकीवरील व्याज: आकस्मिकता आरक्षितांसाठीच्या गुंतवणुका भारत सरकारच्या सेक्युरिटिज्मध्ये केल्या जातात आणि त्यानुसार व्याजाची गणना केली जाते.
- रोखीत रूपांतर झालेली नुकसानभरपाई: विविध उपकरणांची डिलिव्हरी करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेपेक्षा अधिक उशीर झाल्याबद्दल व्हेंडर्सकडून प्राप्त झालेली नुकसानभरपाई एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.

- चलनातील लाभ/हानी प्राप्त होणे: साहित्य प्राप्त झाल्याची तारीख आणि प्रत्यक्ष पैसे दिल्याची तारीख/वर्ष संपल्याची तारीख यांमधील दराचा फरकामुळे परकीय चलनातील लाभ/(हानी) एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.
- भंगाराची विक्री: भंगाराच्या विक्रीतून प्राप्त झालेली रक्कम एनटीआयमध्ये विचारात घेतलेली आहे.
- जमिनीच्या वापरापासून मिळालेले भाड्याचे उत्पन्न: आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डी यांच्यामध्ये जमिनीच्या वापरासाठी झालेल्या समझोता कराराच्या आधारे आरइन्फ्रा–टीला आरइन्फ्रा–डीकडून भाडे प्राप्त होत असते. त्यानुसार से एनटीआयमध्ये विचारात घेतलेले आहे.
- विलंबित प्रदान आकार: एमवायटी नियमावली, २०१५ मधील विनियम ३६.३ नुसार, परवानाधारकाने प्राप्त केलेल्या डीपीसीचा विचार एनटीआयच्या अंतर्गत करू नये. उपरोक्त नियमावलीनुसार आ.व. १६–१७मध्ये आरइन्फ्रा–टीने प्राप्त केलेल्या डीपीसीचा विचार एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेसाठी एनटीआयच्या अंतर्गत केलेला नाही.

#### ४.६.३ इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न

आरइन्फ्रा–टीने त्यांच्या उपकेंद्राच्या छतावरील जागा रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडचा बीटीएस टॉवर उभारण्यासाठी भाड्याने दिलेली आहे. एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ६० अनुसार, इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वजा करून प्राप्त झालेली २/३ रक्कम आरइन्फ्रा–टीने विचारात घेतलेली आहे.

### ४.७ आरइन्फ्रा–टी नेटवर्कच्या उपलब्धतेवर प्रोत्साहन

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) यांनी आरइन्फ्रा–टीसाठी पारेषण प्रणाली उपलब्धता आ.व. १६–१७ साठी ९९.८०% एवढी प्रमाणित केलेली आहे.

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ५७.१ आणि ५७.२ यांच्या एकत्रित वाचनाच्या आधारे आरइन्फ्रा–टीने पारेषण उपलब्धतेवरील प्रोत्साहन, ह्या उपलब्धतेची गणना ९९.७५% पर्यंत सीमित करून केलेली आहे. प्रोत्साहनाची रक्कम रु.२.१५ कोटी एवढी आहे.

### ४.८ आ.व. १६–१७साठी महसुली तफावत/अधिक्य

आ.व. १६–१७साठी महसुली तफावत/अधिक्य हे आंतरराज्य पारेषण प्रणालीतून प्राप्त झालेला महसूल आणि एकत्रित महसुलाची आवश्यकता (दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न आणि इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वगळून) यांची तुलना करून काढलेले आहे. आ.व. १६–१७साठीच्या एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश खालील तक्त्यात दिलेला आहे:

**तक्ता ६: अचूक समायोजन सारांश, आ.व. १६–१७**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | वास्तविक | एमवायटी आदेश | फरक |
|---|---|---|---|---|
| | खर्च | | | |

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | वास्तविक | एमवायटी आदेश | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ५४.०७ | ५३.१९ | ०.८८ |
| २ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ६०.५० | ६२.८७ | (२.३७) |
| ३ | घसारा | ६३.५२ | ६५.४७ | (१.९५) |
| ४ | इक्विटीवरील परतावा | ७५.८६ | ७७.३३ | (१.४७) |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ५.७६ | ६.०३ | (०.२७) |
| ६ | आकस्मिक आरक्षितांसाठी वर्गणी | ३.७१ | ३.७१ | – |
| ७ | आयकर | २५.२१ | २७.९४ | (२.७३) |
| **क** | **एकूण खर्च** | **२८८.६३** | **२९६.५३** | **(७.९१)** |
| ८ | उपलब्धता प्रोत्साहन | २.१५ | – | २.१५ |
| **ख** | **एकूण एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **२९०.७८** | **२९६.५३** | **(५.७५)** |
| | **महसूल** | | | |
| ९ | आंतरराज्य पारेषण प्रणालीतून महसूल | २७१.८२ | २९२.७९ | (२०.९८) |
| १० | दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ४.३० | २.९६ | १.३४ |
| ११ | इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | ०.०९ | ०.०५ | ०.०४ |
| **ग** | **एकूण महसूल** | **२७६.२१** | **२९५.८०** | **(१९.५९)** |
| घ | आ.व. १४–१५च्या तफावतीवर/(अधिक्यावर) कॅरिंग कॉस्ट | (५.७७) | (५.७७) | – |
| च | आ.व. २०१५–१६ पर्यंत संकलित महसुली तफावत/(अधिक्य) | ५.०४ | ५.०४ | – |
| **छ** | **महसुली तफावत/(अधिक्य) = (ख – ग + घ + च)** | **१३.८४** | **–** | **१३.८४** |
| **ज** | **अर्ध्या वर्षासाठी होल्डिंग किंमत** | **०.६३** | | **०.६३** |
| **झ** | **महसुली तफावत/(अधिक्य)= छ + ज** | **१४.४७** | | **१४.४७** |

आरइन्फ्रा–टी माननीय आयोगाला विनंती करीत आहे की, आ.व. १६–१७साठी उपरोक्त महसुली तफावतीला कृपया मान्यता द्यावी.

## ५. आ.व. १७–१८ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता

या विभागात, आरइन्फ्रा–टी, एमवायटी नियमावली, २०१५मधील संबंधित तरतुदींनुसार, आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०साठीच्या अपेक्षित एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेसह, आ.व. १७–१८च्या तात्पुरत्या अचूक समायोजनाच्या उद्देशाने आ.व. १७–१८साठी तात्पुरती वास्तविक आकडेवारी सादर करीत आहे.

### ५.१ भांडवल गुंतवणूक योजना

आ.व. १७–१८साठी (तात्पुरते वास्तविक) आणि आ.व. १८–१९ व आ.व. १९–२० साठी (अपेक्षित) भांडवली खर्च आणि भांडवलीकरण (आयडीसीसहित) पुढीलप्रमाणे आहे:

**तक्ता ७: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण, आ.व. १७–१८**

| तपशील (कोटी रु.) | भांडवली खर्च | भांडवलीकरण | भांडवलीकरण |
|---|---|---|---|
| | तात्पुरते वास्तविक | | एमवायटी आदेश |
| डीपीआर (मान्यता दिलेल्या योजना) | ८१.२२ | ७३.४५ | १२३.४२ |
| डीपीआर (अजून सुरू करणे बाकी योजना) – डीपीआर अजून सादर केल्या नाहीत | – | – | – |
| बिगर डीपीआर | ४.८७ | १०.८४ | २०.०० |
| **एकूण** | **८६.०९** | **८४.२९** | **१४३.४२** |

**तक्ता ८: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण, आ.व. १८–१९**

| तपशील (कोटी रु.) | भांडवली खर्च | भांडवलीकरण | भांडवलीकरण |
|---|---|---|---|
| | अपेक्षित वास्तविक | | एमवायटी आदेश |
| डीपीआर (मान्यता दिलेल्या योजना) | ११४.०० | १७.६८ | ९.८० |
| डीपीआर (अजून सुरू करणे बाकी योजना) – डीपीआर अजून सादर केल्या नाहीत | १८१.०० | – | – |
| बिगर डीपीआर | १५.०० | ३.०० | १.९६ |
| **एकूण** | **३१०.००** | **२०.६८** | **११.७६** |

**तक्ता ९: भांडवली खर्च आणि भांडवलीकरण, आ.व. १९–२०**

| तपशील (कोटी रु.) | भांडवली खर्च | भांडवलीकरण | भांडवलीकरण |
|---|---|---|---|
| | अपेक्षित वास्तविक | | एमवायटी आदेश |
| डीपीआर (मान्यता दिलेल्या योजना) | १९३.७६ | ३५३.१७ | – |
| डीपीआर (अजून सुरू करणे बाकी योजना) – डीपीआर अजून सादर केल्या नाहीत | ६३९.३६ | | – |

| तपशील (कोटी रु.) | भांडवली खर्च | भांडवलीकरण | भांडवलीकरण |
|---|---|---|---|
| | अपेक्षित वास्तविक | | एमवायटी आदेश |
| बिगर डीपीआर | २०.०० | ३०.०० | – |
| **एकूण** | **८५३.११** | **३८३.१७** | **–** |

### ५.१.१ अर्थपुरवठ्याची योजना

आम्ही असे म्हणतो की, ०१–०४–२०१७ रोजीनुसारच्या आरंभीच्या सीडब्ल्यूआयपीच्या पुनर्वित्तीकरणासाठी किंवा आ.व. १७–१८ मधील वाढत्या भांडवली खर्चासाठी निधी उभारण्यासी कोणतीही नवीन कर्जे घेतलेली नाहीत. आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०च्या भांडवली खर्चाच्या योजनांसाठी निधी पुरवठा करण्यासाठी, सध्या ७० : ३० ह्या प्रमाणात डेट : इक्विटी भांडवली रचनेतून करणे अपेक्षित आहे.

### ५.१.२ निवृत्ती

आरइन्फ्रा–टीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी रु.०.६२ कोटी एवढ्या किमतीच्या विशिष्ट मत्ता आ.व. १७–१८मध्ये प्रणालीतून निवृत्त केलेल्या आहेत. निवृत्तीचा हा परिणाम त्यानुसार ढोबळ स्थिर मत्ता (जीएफए), घसारा, भांडवली कर्ज आणि इक्विटीवरील परतावा यांमध्ये समायोजित केलेला आहे.

### ५.१.३ भांडवली कर्जावरील व्याज

आरइन्फ्रा–टीने आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२० पर्यंतची आरंभीची नमुनेदार कर्जाची शिल्लक रक्कम अनुक्रमे आ.व. १६–१७ ते आ.व. १८–१९ च्या अखेरच्या नमुनेदार कर्जाच्या शिल्लक रकमेएवढा विचारात घेतलेली आहे. आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२० पर्यंतचे ७०% भांडवलीकरण प्रत्येक वर्षाच्या दरम्यान मत्तांमध्ये वाढ झाल्याचे विचारात घेतलेले आहे.

एमवायटी नियमावली, २०१५ मधील विनियम २९.३ अनुसार, प्रत्येक वर्षातील परतफेड त्या वर्षासाठी अनुज्ञेय असलेल्या घसाऱ्याएवढी समजण्यात येईल.

परंतु, आ.व. १७–१८चा जोपर्यंत संबंध आहे, तोपर्यंत दीर्घकालीन कर्जावरील व्याजाची गणना एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम क्र. २९.५मध्ये दिलेली पहिली अट विचारात घेऊन करण्याची गरज आहे.

आरइन्फ्रा–टीचे म्हणणे असे आहे की, त्यांनी व्याजाचा वेटेड अॅव्हरेज रेटची गणना वर्षादरम्यानच्या वास्तविक लोन पोर्टफोलिओच्या आधारे केलेली आहे. वेटेड अॅव्हरेज इंटरेस्ट रेट १०.४९% एवढा येतो.

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २९.५ अनुसार आरइन्फ्रा–टीने त्यांच्या कर्जाच्या संभाव्य शिल्लक रकमेची गणना, आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी, विविध बँकाच्या परतफेडीच्या वेळापत्रकानुसार प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत वास्तविक संकलित परतफेड विचारात घेऊन, प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजीनुसार केलेली आहे.

आ.व. १८–१९साठी व्याजदर, १ एप्रिल २०१८ रोजी प्रचलित असलेले विचारात घेतलेले आहेत. आ.व. १९–२०साठी विचारात घेतलेला व्याजदर हा ३१–०५–२०१८ रोजी प्रचलित असलेला विचारात घेतलेला आहे. त्यानंतर विविध बँकांचे व्याजदर आणि आ.व. १८–१९ ते आ.व. १९–२० मधील प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी बाकी असलेली कर्जाची वास्तविक रक्कम यांना वापर करून वेटेड ॲव्हरेज रेट काढलेला आहे. वेटेड ॲव्हरेज इंटरेस्ट रेट आ.व. १८–१९साठी ९.९८% एवढा आहे आणि आ.व. १९–२० साठी १०.४८% एवढा आहे. अशा प्रकारे निश्चित करण्यात आलेला व्याजदर त्यानंतर एमवायटी नियमावली, २०१५ नुसार एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेसाठी लागू करायवयचे व्याज निश्चित करण्यासाठी नमुनेदाखलच्या कर्जाच्या शिल्लक रकमेसाठी (घसाऱ्याएवढी परतफेड विचारात घेऊन) लावला जातो.

### ५.१.४ घसारा

आरइन्फ्रा–टीने आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२० साठीचा आरंभीचा जीएफए हा अनुक्रमे आ.व. १६–१७ ते आ.व. १८–१९ साठीच्या अखेरच्या शिलकीएवढा विचारात घेतलेला आहे.

आ.व. १७–१८ साठी आरंभीच्या जीएफएवर (ग्रॉस फिक्स्ड असेट) घसाऱ्याचा दावा करण्यात आलेला आहे आणि वर्षभरात जोडलेल्या मत्तेवरही तो करण्यात आलेला आहे (जोडल्याच्या वास्तविक तारखेनुसार त्या प्रमाणात).

आ.व. १८–१९ ते आ.व. १९–२० या वर्षांदरम्यान मत्तांच्या वेगवेगळ्या वर्गांमध्ये जोडलेल्या अंदाजित मत्ता त्या वर्षाच्या आरंभीच्या जीएफएच्या प्रमाणात विचारात घेतलेल्या आहेत.

एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २७ नुसार घसाऱ्याची गणना केलेली आहे.

### ५.१.५ इक्विटीवरील परतावा

इक्विटीवरील परतावा (आरओई), एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम २८ वर आधारित म्हणजेच समभाग भांडवलावर वर्षाच्या सुरुवातीला १५.५% दराने अधिक वर्षाच्या दरम्यान भांडवलीकरण केलेल्या मत्तांचा ५०% इक्विटी पोर्शनवर गणला गेला आहे. हे एमवायटी नियमावली, २०१५च्या विनियम २८.२ आणि २८.३ नुसार आहे.

## ५.२ प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्च

आरइन्फ्रा–टीने प्रत्येक वर्षासाठी जोडल्या गेलेल्या सर्किट किमी आणि बेज्चा अंदाज हा पूर्ण केलेल्या विविध प्रस्तावित भांडवली कामांवर आधारित आहे. आरइन्फ्रा–टीच्या प्रणालीमध्ये याआधीच असलेल्या व्होल्टेजसाठी एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ५८.४मध्ये तरतूद केल्यानुसार मापदंड लागू केलेले आहेत.

यापुढे आमचे असे म्हणणे आहे की, आ.व. १६–१७च्या ओ अँड एम विभागात विषद केल्यानुसार पीडब्ल्यूडीकडून मागणी करण्यात आलेली आहे, ज्यासाठी आ.व. १६–१७मध्ये पैसे दिले गेले आहेत आणि ते आ.व. १६–१७साठीच्या नमुनेदाखलच्या अनुज्ञेय रकमांच्या व्यतिरिक्त विचारात घेतलेले आहेत. आरइन्फ्रा–टीने आ.व. १७–१८मध्ये पीडब्ल्यूडीला रु.०.०९ कोटी एवढी रक्कम दिलेलीही आहे. त्याच प्रकारे, आरइन्फ्रा–टीने आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी पीडब्ल्यूडीसाठीचे आकार, पीडब्ल्यूडीने केलेल्या मागणीच्या आधारे अंदाजित केलेले आहेत. आरइन्फ्रा–टी आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२०साठी पीडब्ल्यूडीसाठीच्या आकाराचा दावा नमुनेदाखलच्या प्रचालन आणि देखभाल खर्चाच्या व्यतिरिक्त करीत आहे आणि माननीय आयोगाला ते विचारात घेण्याची विनंती करीत आहे.

आरइन्फ्रा–टीने सध्या अंदाजित केलेले प्रचालन आणि देखभाल खर्च पुढीलप्रमाणे आहेत:

**तक्ता १०: प्रचालन आणि देखभाल खर्च, आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२०**

| | आ.व. 17-18 | आ.व. 18-19 | आ.व. 19-20 |
|---|---|---|---|
| | तात्पुरते वास्तविक | सुधारित भाकीत | |
| सर्किट किमी आधार (मापदंडांनुसार) | ३.३५ | ३.५२ | ३.७८ |
| बेज्ची संख्या आधार (मापदंडांनुसार) | ५३.१९ | ५६.५४ | ६१.२४ |
| जमिनीच्या भाड्यासाठी आकार – पीडब्ल्यूडी | ०.०९ | ०.०९ | ०.०९ |
| **एकूण** | **५६.६२** | **६०.१५** | **६५.१२** |

### ५.३ खेळत्या भांडवलावरील व्याज

आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२० साठी खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेची गणना, एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ३१.२ नुसार केलेली आहे.

आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२०साठी व्याजाचा दर, एमवायटी (पहिली सुधारणा) नियमावली, २०१७ नुसार म्हणजेच आ.व. १७–१८साठी १०.२०% आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०साठी ९.७५% एवढा विचारात घेतलेला आहे.

### ५.४ आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी

एमवायटी नियमावली, २०१५मध्ये आकस्मिक आरक्षितासाठीची (सीआर) वर्गणीसाठी आरंभीच्या जीएफएच्या ०.२५% दराने तरतूद केलेली आहे. आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२०मधील प्रत्येक वर्षासाठी आरंभीच्या जीएफएवर ०.२५% लागू करण्यात आलेले आहे.

## ५.५ आयकर

एमवायटी नियमावली, २०१५च्या विनियम ३३.१नुसार, आरइन्फ्रा–टीसाठीचा आयकर, आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२०साठी, या याचिकेत आ.व. १६–१७साठी हिशेब केलेल्या पातळीनुसार तात्पुरत्या स्वरूपात विचारात घेण्यात आलेला आहे.

## ५.६ महसूल

### ५.६.१ आंतरराज्य पारेषण प्रणालीपासून महसूल

आ.व. १७–१८साठीच्या पारेषण आकारांपासूनच्या महसुलासाठी, ते २०१६च्या प्रकरण क्र. ९१मध्ये दिलेल्या दिनांक २२–०७–२०१७च्या आंतरराज्य पारेषण प्रणाली आदेशाएवढे, म्हणजेच, दरसाल रु.३१०.१५ कोटी एवढ्या बिल केलेल्या महसुलाएवढे आहेत. आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२०साठी पारेषणापासूनच्या महसुलासाठी, आरइन्फ्रा–टी पारेषणापासूनचा अंदाजित महसूल हा सदर वर्षांसाठी भाकीत केलेल्या एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेएवढा आहे, ज्यात या याचिकेत सादर केल्यानुसार आ.व. १५–१६ ते आ.व. १७–१८ साठीच्या परिणामस्वरूपीची तफावत/अधिक्य समाविष्ट आहे.

### ५.६.२ दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आ.व. १७–१८साठी तात्पुरत्या वास्तविक आकडेवारीवर आधारित आहेत आणि आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठीचे भाकीत खाली दिल्यानुसार आहे:

- आकस्मिक आरक्षितांसाठीच्या गुंतवणुकीवरील व्याज: आकस्मिकता आरक्षितांसाठीच्या गुंतवणुका भारत सरकारच्या सेक्युरिटिज्मध्ये केल्या जातात आणि त्यानुसार व्याजाची गणना केली जाते.
- जमिनीच्या वापरापासून मिळालेले भाड्याचे उत्पन्न: आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डी यांच्यामध्ये जमिनीच्या वापरासाठी झालेल्या समझोता कराराच्या आधारे आरइन्फ्रा–टीला आरइन्फ्रा–डीकडून भाडे प्राप्त होत असते. त्यानुसार से एनटीआयमध्ये विचारात घेतलेले आहे.
- इतर शीर्षके: एनटीआयने, रोखीत रूपांतर झालेली नुकसारभरपाई, भंगाराची विक्री, इत्यादींसारखी इतर शीर्षके, आ.व. १७–१८साठी तात्पुरत्या वास्तविक आकडेवारीवर आधारित आहेत. आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी ह्या शीर्षकांचे ह्या टप्प्यावर यावेळी कोणत्याही निश्चिततेसह भाकीत करता येत नाही. म्हणून सध्या दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नात समाविष्ट केलेल्या घटकांशिवाय इतर घटकांचे भाकीत केलेले नाही.

### ५.६.३ इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न

आरइन्फ्रा–टीने त्यांच्या उपकेंद्राच्या छतावरील जागा रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडचा बीटीएस टॉवर उभारण्यासाठी भाड्याने दिलेली आहे. एमवायटी नियमावली, २०१५मधील विनियम ६० अनुसार, इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न वजा करून प्राप्त झालेली २/३ रक्कम आरइन्फ्रा–टीने विचारात घेतलेली आहे.

## ५.७ आ.व. १५–१६ आणि आ.व. १६–१७ साठीच्या महसुली तफावतीवरील/अधिक्यावरील कॅरिंग कॉस्टसहित आ.व. १७–१८ पर्यंत संकलित महसुली तफावत,

आ.व. १५–१६ साठी महसुली तफावतीवरील/अधिक्यावरील कॅरिंग कॉस्ट ही एमवायटी नियमावली, २०११नुसार, म्हणजेच एसबीआय पीएलआरने गणलेली आहे. आ.व. १५–१६ साठीचा एसबीआर पीएलआर १४.७५% आहे, जो माननीय आयोगानेही एमवायटी आदेशात विचारात घेतला होता.

आ.व. १६–१७ आणि आ.व. १७–१८साठी कॅरिंग कॉस्ट १०.७९% आणि १०.२०% एवढी, याआधी दिलेल्या कारणमीमांसेनुसार विचारात घेतलेली आहे.

त्यानुसार, आरइन्फ्रा–टीने, खाली दिलेल्या तक्त्यात दिल्यानुसार आ.व. १७–१८च्या शेवटी कॅरिंग कॉस्टची आणि संकलित महसुली तफावतीची/अधिक्याची गणना केलेली आहे. कॅरिंग कॉस्टची गणना, उपलब्धता प्रोत्साहन वगळून केलेली आहे.

**तक्ता ११: कॅरिंग कॉस्टची गणना**

| तपशील | कोटी रु. |
|---|---|
| आ.व. १५–१६साठी वाढती महसुली तफावत | ३.३३ |
| आ.व. १६–१७साठी महसुली तफावत | १४.४७ |
| आ.व. १७–१८ साठी तात्पुरती महसुली तफावत/अधिक्य | (२५.०५) |
| आ.व. १५–१६ साठी महसुली तफावतीवरील कॅरिंग कॉस्ट | ०.१४ |
| आ.व. १६–१७ साठी महसुली तफावतीवरील कॅरिंग कॉस्ट | १.२६ |
| **कॅरिंग कॉस्टसाठी संकलित महसुली तफावत/(तफावत)** | **(५.८५)** |

आरइन्फ्रा–टी सदर रक्कम आ.व. १८–१९मध्येच वसूल करण्याचे प्रस्तावित करीत आहे आणि यानंतरची कॅरिंग कॉस्ट टाळण्यासाठी ती आ.व. १९–२० पर्यंत बाकी ठेवायची नाही. सदर महसुली अधिक्यायवर आरइन्फ्रा–टीने अर्ध्या वर्षासाठी कॅरिंगचा हिशेब केलेला आहे, कारण आ.व. १८–१९मध्ये वसुली/परतावा वर्षभर एकसारखा वसूल केला जाईल. ही पुढील कॅरिंग कॉस्ट रु.०.२९ कोटी एवढी आहे.

### ५.८ संकलित महसुलाची आवश्यकता

वर उल्लेख केलेल्या या वेगवेगळ्या घटकांवर आधारित भाकीत एकत्रित महसुलाची आवश्यकता (एआरआर) आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२० साठी खालील तक्त्यात दाखविल्यानुसार आहे:

**तक्ता १२: आ.व. १७–१८ ते आ.व. १९–२० साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता**

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | आ.व. १७–१८ | | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | तात्पुरते वास्तविक | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| | **खर्च** | | | | | | |
| १ | प्रचालन आणि देखभाल खर्च | ५७.१६ | ५६.६२ | ६१.३६ | ६०.१५ | ६४.४२ | ६५.१२ |
| २ | दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | ६४.१८ | ५४.८९ | ६२.०९ | ४९.२० | ५४.२५ | ५८.६७ |
| ३ | घसारा | ७१.२९ | ६४.७८ | ७५.३२ | ६९.२७ | ७५.५८ | ७९.६१ |
| ४ | इक्विटीवरील परतावा | ८२.६६ | ७८.३१ | ८६.२७ | ८०.७४ | ८६.५४ | ९०.१३ |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ६.४० | ५.९७ | ६.७२ | ५.५० | ६.७० | ६.०५ |
| ६ | आकस्मिक आरक्षितासाठी वर्गणी | ३.९२ | ३.७६ | ४.२८ | ३.९७ | ४.३१ | ४.०२ |
| ७ | आयकर | २७.९४ | २५.२१ | २७.९४ | २५.२१ | २७.९४ | २५.२१ |
| **क** | **एकूण खर्च** | **३१३.५५** | **२८९.५६** | **३२३.९८** | **२९४.०४** | **३१९.७३** | **३२८.८१** |
| | **आंतरराज्य पारेषण प्रणालीव्यतिरिक्तचा महसूल** | | | | | | |
| ८ | दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | ३.३४ | ४.३७ | ३.७७ | ३.८२ | ४.३४ | ४.२१ |
| ९ | इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | ०.०६ | ०.०९ | ०.०६ | ०.०९ | ०.०६ | ०.०९ |
| **ख** | **एकत्रित महसुलाची आवश्यकता (क – ८ – ९)** | **३१०.१५** | **२८५.१०** | **३२०.१५** | **२९०.१३** | **३१५.३३** | **३२४.५२** |
| ग | आंतरराज्य पारेषण प्रणालीपासूनचा महसूल | ३१०.१५ | ३१०.१५ | ३२०.१५ | | ३१५.३३ | |
| **घ** | **आ.व. १७–१८च्या अखेरीपर्यंत संकलित महसुली** | | | | **(५.८५)** | | |

| अ.क्र. | तपशील (कोटी रु.) | आ.व. १७–१८ | | आ.व. १८–१९ | | आ.व. १९–२० | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | तात्पुरते वास्तविक | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत | एमवायटी आदेश | सुधारित भाकीत |
| | तफावत | | | | | | |
| च | संकलित महसुली तफावतीवरील कॅरिंग कॉस्ट | | | | (०.२९) | | |
| छ | निव्वळ एकत्रित महसुलाची आवश्यकता (ख –ग + घ + च) | – | | – | २८४.०० | – | ३२४.५२ |

आरइन्फ्रा–टी माननीय आयोगाला, आ.व. १८–१९ आणि आ.व. १९–२० साठी पारेषण दरांपासून वसूल करावयाच्या उपरोक्त एकत्रित महसुलाच्या आवश्यकतेला मान्यता देण्याची विनंती करीत आहे.